# महाराष्ट्र मंडळ, पिट्स्बर्ग

महाराष्ट्र मंडळ, पिट्स्बर्ग

# वार्तापत्र

## वर्ष क्र. २५, अंक क्र. २

संचालक मंडळ (२०१०-११)

अध्यक्ष:

शंतनु भिडे

उपाध्यक्ष:

अनुप कणेरी

सचिव:

रवी त्रिपाठी

कोषाध्यक्षा:

अंजली मेढेकर

जनसंपर्क आणि वार्तापत्र:

अक्षय राजहंस

जाल-संचालक:

राजेश दिवेकर

कार्यकारी सभासद:

कुमार आपटे

कौस्तुभ गिंडे

मनीष जाधव

श्रिया जोग

वृषाली जोशी

विनायक मोघे

दीपाली पेवेकर

विद्यार्थी प्रतिनिधी:

शेषन अनंतसुब्रमण्यम

गेल्या वर्षीच्या दिवाळी कार्यक्रमाने मंडळाच्या रौप्यमहोत्सवी वर्षाची सुरुवात झाली आणि कालच्या कार्यक्रमाने त्याची सांगता झाली. या पंचविसाव्या वर्षीच्या संचालक मंडळावर काम करण्याची संधी आम्हा सर्वांना मिळाली हे आम्ही आमचे भाग्य समजतो. १९८६ साली स्थापन झालेल्या या मंडळाची आजपर्यंतची वाटचाल अभिमानास्पद आणि कौतुकास्पद अशी आहे.

२०११ या वर्षात मंडळाने दहा वैविध्यपूर्ण कार्यक्रम सादर केले व नवनवीन उपक्रम राबविले.

1. संक्रांतीचा कार्यक्रम
2. हिवाळी सहल (स्की व स्नो–ट्यूबिंग)
3. किशोरगटासाठी चित्रपट
4. रौप्यमहोत्सवी लोगो स्पर्धा
5. गुढीपाडव्यानिमित्त शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम
6. ऋतू आणि सण यांवर आधारित 'रंगसंगीत' हा सदाबहार कार्यक्रम
7. उन्हाळी सहल (पिकनिक)
8. भारताच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त अन्नदान कार्यक्रम
9. श्रीगणेश चतुर्थी
10. दिवाळी

यांतील किशोरगटासाठी चित्रपट आणि हिवाळी सहलीसारखे काही कार्यक्रम मंडळाच्या इतिहासात प्रथमच सुरू केले गेले, तर संक्रात आणि गणेशचतुर्थीसारखे नेहमीचे कार्यक्रमदेखील पतंग बनवण्यासारखा अनोख्या

उपक्रमांतून आणि ढोल–ताशा–लेझीमच्या यशस्वी प्रयोगांतून अधिक बहारदार झाले. या सर्व कार्यक्रमांत आपण उत्साहाने भाग घेतलात, आयोजनात मदत केलीत आणि कार्यक्रम यशस्वी केलेत. त्याबद्दल आपणां सर्वांचे मनःपूर्वक आभार.

यापैकी उन्हाळी सहलीपर्यंतच्या कार्यक्रमांचा आढावा पूर्वार्धातील वार्तापत्रात आम्ही घेतला होता. उर्वरित कार्यक्रमांबद्दल थोडक्यात माहिती या वार्तापत्रात देत आहोत.

याशिवाय आम्ही मंडळाच्या संकेतस्थळावरील पानातही काही छोट्यामोठ्या सुधारणा केल्या. मूळ इंग्रजीत असलेल्या दुव्यांचे मराठीतील भाषांतर दिसू लागण्याची व्यवस्था करण्यात आली. तसेच संकेतस्थळाच्या माध्यमातून सभासदांना एकमेकांना सूचनाफलकाच्या माध्यमातून एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. सूचनाफलकावर आजच्या घडीला १९ निरनिराळ्या सूचना/विषय मांडण्यात आले आहेत. येत्या काही काळात या मंचाची लोकप्रियता आणि उपयुक्तता आणखी वाढेल अशी आम्हाला आशा आहे.

या वर्षीच्या कार्यकारिणीवर आम्हाला काम करायची संधी दिल्याबद्दल आणि वर्षभरात आम्हाला दिलेल्या भरघोस प्रतिसादाबद्दल आम्ही आपले अत्यंत आभारी आहोत.

धन्यवाद!

संचालक मंडळ २०१०–११,
महाराष्ट्र मंडळ पिट्स्बर्ग

## स्वातंत्र्यदिनानिमित्त अन्नदान कार्यक्रम

भारताच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त महाराष्ट्र मंडळाने अन्नदान उपक्रम राबविला. मंडळाच्या सभासदांपैकी सुमारे २५ मोठ्या व १० छोट्यांनी या उपक्रमात हिरिरीने सहभाग घेतला. या उपक्रमाच्या निमित्ताने गरजू लोकांसाठी छोले, बटाटा रस्सा, भात, नान, आणि सॅलड असं खास भारतीय जेवण बनवण्यात आलं. सकाळी ११ वाजता स्वयंपाकास सुरुवात झाली आणि दुपारी १ वाजेपर्यंत सगळं अन्न तयार होऊन "लाईट ऑफ लाईफ" (http://lightoflife.org) या संस्थेकडे संध्याकाळच्या जेवणासाठी वेळेत रवाना झालं. या कार्यक्रमासाठी हिंदू–जैन मंदिराच्या स्वयंपाकघराची व्यवस्था उपलब्ध करून दिल्याबद्दल मंदिराचे आभार. तसेच या अन्नदान उपक्रमासाठी उपस्थित असलेल्य सर्व स्वयसेवकांचे आभार:

• त्रिशा व अमिता अंबे • आशना, मोहित, वीणा व शंतनु भिडे • रिया व राजेश दिवेकर • कौस्तुभ गिंडे • शोभा व अरुण जतकर • श्रिया जोग • शारदा व अनुप कणेरी • मिहीर व अनघा लेले • ज्योती मुळे • अरविंद पाठक • नताशा, निकिता, सीमा व शैलेश पाटकर • पूर्णिमा सांपळे

या कार्यक्रमाची छायाचित्रे मंडळाच्या संकेतस्थळावर पहावीत.

## गणेशचतुर्थीच्या कार्यक्रमाचा आढावा

सालाबादप्रमाणे याही वर्षी मंडळाची गणेश चतुर्थी हिंदू-जैन मंदिरात साजरी झाली. या वर्षीच्या कार्यक्रमाची काही खास वैशिष्ट्ये अशी:

- पिट्सबर्गच्या निरनिराळ्या विद्यापिठांत शिकणारे विद्यार्थी मंडळाच्या गणेशचतुर्थीच्या कार्यक्रमासाठी उपस्थित राहू इच्छितात. दरवर्षी मंडळाच्या सभासदांमार्फत त्यांची जाण्यायेण्याची सोय केली जाते. या वर्षी मात्र विद्यार्थ्यांकडून मिळालेल्या अभूतपूर्व प्रतिसादामुळे एका खास बसची व्यवस्था केली गेली. कार्नेगी मेलन विद्यापीठ, पिट्स्बर्ग विद्यापीठ, ड्युकेन विद्यापीठ, इ. विद्यापिठांतील सुमारे ५० विद्यार्थ्यांनी या सेवेचा लाभ घेतला.
- या वर्षी ढोल-ताशा आणि लेझीमच्या गजरात गणरायाची मिरवणूक मंदिराच्या खालच्या सभागृहापासून मुख्य मंदिरापर्यंत नेण्यात आली.
- या वर्षी लहान मुलामुलींनी गणपती अथर्वशीर्ष आणि अगदी लहान मुलामुलींनी "प्रणम्य शिरसा देवम्" या श्लोकांचे पठण केले.

- या वर्षीची पूजा मंडळाची दीर्घकालीन सभासद श्री. अरूण व सौ. शोभा जतकर यांच्या हस्ते करण्यात आली. (श्री. अरूण जतकर यांचे या गणेशचतुर्थी कार्यक्रमाबद्दलचे मनोगत पुढे देत आहोत.)
- मंडळाच्या मिरवणुकीची चित्रफीत शैलेश बोकील यांनी काढली आणि मंडळाचे सभासद आलोक करंबेळकर यांनी उत्स्फूर्तपणे ती साम टीव्हीकडे पाठवली. त्यानुसार आपल्या मिरवणुकीचा समावेश साम टीव्हीवर गणेशोत्सवातील एका खास कार्यक्रमात करण्यात आला. त्याची चित्रफीत यूट्यूब वर `http://www.youtube.com/watch?v=SIeNxwMC9wg` येथे पहावी.

लेझीम आणि स्तोत्र पठणाच्या कार्यक्रमात खालील मुलामुलींनी भाग घेतला. त्यांचे अभिनंदन:

• करण बोकील • सूरज बोकील • श्रेयस रायखेळकर • हरीश व्यंकट • कुमुदिनी व्यंकट • आशना भिडे • मोहित भिडे • अर्णेश दांडेकर • शाल्मली जोशी • रोहन परांजपे • दिव्या भट • आदि बाळसराफ • तनव दांडेकर

लेझीम आणि स्तोत्र पठणाचे कार्यक्रम मुलांकडून बसवून घेण्यात खालील व्यक्तींची मदत झाली. त्यांचे विशेष धन्यावादः

• सुचेता आणि विनायक मोघे • तेजस परांजपे • अक्षय राजहंस • श्रिया जोग

या कार्यक्रमासाठी श्री. रत्नाकर मुजुमदार यांनी खास आरास तयार केली होती. त्याबद्दल त्यांचे धन्यवाद.याशिवाय ढोल-ताशा मिळविण्यासाठी कौस्तुभ गिंडे यांनी खूप धडपड केली आणि शहराच्या आसपासची अनेक दुकाने पालथी घातली. ढोल-ताशामुळे या वर्षीच्या मिरवणुकीला एक वेगळाच रंग चढला. कौस्तुभने घेतलेल्या मेहनतीबद्दल त्यांचेही खास धन्यवाद! त्याशिवाय ज्या सभासदांनी महाप्रसादासाठी अन्न वाढायला मदत केली त्या सर्वांचे विशेष आभार!

गणेशचतुर्थीच्या कार्यक्रमासाठी मंडळाच्या सभासदांना आणि उपस्थितांना मंडळ महाप्रसाद म्हणून भोजनाची व्यवस्था करते. शिवाय या वर्षी विद्यार्थ्यांसाठी खास बसची व्यवस्था करण्यात आली. यांसाठी मंडळ कोणतेही शुल्क आकारत नाही. परंतु मंडळाला सभासदांनी दिलेल्या देणग्यांच्या रकमेतून हा खर्च निभावला जातो. या वर्षीच्या खालील देणगीदारांचे आभार :

• बदामी • बेळंबे • बेरीवाल • भडसावळे • (हेमंत) भावे • भेंडे • भिडे • चंद्रा • अनामिक • देवरस • दिवेकर • (बळवंत) दीक्षित • (निरंजन) दीक्षित • गांधी • घाटे • गिंडे • हेगडे • (राजेंद्र) जाधव • जतकर • (शरद) जोशी • कापडिया • लांबोर • लोवलेकर • मर्ढीकर • मेढेकर • मनोहर • मुजुमदार • फुले • राव • वालावलकर • साबडे सांपळे • साने • तेरेदेसाई • उमरेडकर • वर्टी

या सर्वांचे विशेष धन्यवाद!

ह्या वर्षीच्या पूजेचे यजमान श्री. अरूण जतकर यांनी आम्हाला लिहून पाठवलेले गणेशचतुर्थी सोहळ्याबद्दलचे मनोगत आम्ही आपल्याला ईमेलद्वारे आपल्याला पाठवले होते. संग्रहाखातर ते या वार्तापत्रात पुन्हा समाविष्ट करीत आहोत.

अमेरिकेच्या पेन्सिल्वेनिया प्रांतातील पिट्स्बर्ग या शहरातील महाराष्ट्र मंडळाने आज रविवार दि. ४ सप्टेंबर २०११ रोजी गणेश चतुर्थी साजरी केली. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गणेशपूजा पिट्स्बर्गच्या हिंदु-जैन मंदिरात करण्यात आली. २००हून अधिक मंडळी कार्यक्रमास उपस्थित होती.

सकाळी १० वाजता श्रींची मूर्ति वाजतगाजत मंदिरात आणण्यात आली. महाराष्ट्र मंडळाच्या सभासदांच्या वय वर्षे ४ ते १२ या वयोगटातील मुला-मुलींनी लेझीम खेळून आणि ढोल वाजवून गणेश आगमनाची मिरवणूक मोठी रंगतदार केली. डॉ. रत्नाकर मुजुमदार यांनी अष्टविनायक-दर्शनाची आकर्षक आरास स्वहस्ते बनवून आणली होती. पदव्युत्तर शिक्षणासाठी भारतातून पिट्स्बर्गमधे आलेल्या भारतीय विद्यार्थ्यांनाही या कार्यक्रमात सहभागी होता व्हावे म्हणून महाराष्ट्र मंडळाने त्यांना विद्यापीठांमधून आणण्यासाठी व परत सोडण्यासाठी खास बसची सुविधा उपलब्ध केली होती; सुमारे ५० विद्यार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घेतला. अमेय रानडे आणि अमोल देशपांडे या दोन विद्यार्थ्यांनी आरास सजविण्याच्या कामी विशेष साह्य केले. पिट्स्बर्गच्या महाराष्ट्र मंडळाच्या एका दीर्घकालीन सभासद कुटुंबाने मंदिरातील अर्चक श्री. पाण्डे शास्त्रीजी यांच्या दिग्दर्शनाखाली श्रींची पूजा केली. पूजेचा समारोप गणपति-अथर्वशीर्षाच्या सामुदायिक पठणाने झाला. प्रौढांनी पहिले आवर्तन केल्यावर दुसरे आवर्तन लहान मुला-मुलींनी केले. तीस-चाळीस वर्षांपूर्वी अमेरिकेत स्थायिक झालेल्या मराठी कुटुंबांच्या दृष्टिकोनातून पाहता ही 'नातवंडांची पिढी' होय; आणि या नातवंडांच्या पिढीतील मुलामुलींना गणपति-अथर्वशीर्ष तोंडपाठ आहे, ही आम्हा अमेरिकावासींना अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.

आरत्यांच्या सामुदायिक पठणाने गणेशपूजेचा कार्यक्रम संपन्न झाला. मंडळाच्या सभासदांनी घरी स्वतः बनवून आणलेल्या खिरापतीच्या पदार्थांनी सगळ्यांचे तोंड गोड झाले. शिवाय पिट्स्बर्गमधे शाकाहारी स्वयंपाकासाठी सुप्रसिद्ध असलेल्या 'उडपा'कडून बनवून घेतलेल्या महाप्रसादाने भोजन अतिशय रुचकर झाले होते. महाप्रसादानंतर पिट्स्बर्गमधील स्थानिक गायिकांनी गणेशभक्तिपर आणि विठ्ठलभक्तिपर मराठी भजनांचा मोठा सुरेल आणि सुरस कार्यक्रम सादर केला. ज्यांची मातृभाषा मराठी नाही अशा ह्या तेलुगू, तमिळ आणि कानडी गायिकांनी ही भजने अस्खलित मराठीत गाऊन सर्व श्रोत्यांना आश्चर्य आणि आनंद अशा दुहेरी अनुभूतीचा अलभ्य लाभ करून दिला, एवढा की दोनतीन भजने पुन्हा एकदा म्हणायचा श्रोत्यांनी त्यांना आग्रह केला.

सार्वजनिक गणेशपूजेबाबत सर्वांचा प्रचंड उत्साह, मराठी बाल-बालिकांचा अनमोल सहभाग, सोज्वळ धार्मिक विधीची सांगता, रुचकर भोजन आणि सुश्राव्य भक्तिगीतांची मेजवानी अशा ह्या पंचकल्याणी कार्यक्रमाने पिट्स्बर्गच्या महाराष्ट्र मंडळाच्या दैदीप्यमान् रौप्यमहोत्सवी वर्षाचे माहात्म्य वृद्धिंगत केले.

— अरुण जतकर, मन्रोविल्, पेन्सिल्वेनिया, यू.एस.ए.

# दिवाळीच्या कार्यक्रमाचा आढावा

२०११ सालच्या दिवाळी कार्यक्रमाने मंडळाच्या रौप्यमहोत्सवी वर्षाची सांगता झाली. सुमारे ३०० हून अधिक लोकांच्या उपस्थितीत या वर्षीचा दिवाळी कार्यक्रम नॉर्थ अॅलिगेनी इंटरमीजियेट् शाळेच्या सभागृहात पार पडला. दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास फराळ आणि गाठीभेटींनी कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर मंडळाच्या ज्येष्ठ सभासद सौ. सुधा दीक्षित यांच्यासह इतरांनी दिवाळीनिमित्त श्रीलक्ष्मीची आरती केली. त्यानंतर विविधगुणदर्शनाचा कार्यक्रम सभागृहात सुरु झाला. पिट्स्बर्गमधील लहानमोठ्या सर्व वयोगटातील सभासदांनी एकापेक्षा एक सुरेख असे २० कार्यक्रम सादर केले. यांत शास्त्रीय, उपशास्त्रीय आणि अर्वाचीन असे नृत्याचे प्रकार, संगीत आणि नाटक असे सर्व कलाप्रकार समाविष्ट होते.

मनोरंजनाच्या कार्यक्रमानंतर मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. मंडळाच्या मावळत्या संचालक मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि कोषाध्यक्षा यांनी वर्षभरातल्या कार्यक्रमांचा आणि मंडळाच्या आर्थिक परिस्थीतीचा आलेख सभासदांसमोर मांडला. त्यानंतर नवीन वर्षीच्या संचालक मंडळावरील सदस्यांची निवड केली गेली. मंडळाच्या निर्वाचन समितीवरील श्री. अजय बेळंबे आणि सौ. सुचिता लांबोर यांनी नवीन वर्षीच्या संचालक मंडळाची ओळख करून दिली. त्यानंतर सर्वांनी जेवणाचा आस्वाद घेतला. शेवटी प्रदीप फुले, विनिता बेळंबे आणि शकुंतला शिंदे सादर केलेल्या कॅरिओकी गीतांवर सर्वांनी आधी दांडियाचा आणि नंतर उत्स्फूर्त नृत्याचा आनंद घेतला.

दर कार्यक्रमाप्रमाणे याही वेळी आम्हाला अन्न वाढण्यासाठी अनेक सभासदांनी उत्स्फूर्तपणे मदत केली, त्याबद्दल त्या सर्वांचे आभार! तसेच दरवर्षीप्रमाणे याही वर्षी रॅफल्सच्या माध्यमातून निधी गोळा करण्यात आला. या वर्षी मंडळाकडे सुमारे ४५० डॉलर्स निधी गोळा झाला. रॅफल्स विजेत्यांचे अभिनंदन आणि रॅफल्स पुरस्कर्त्यांचे खास आभार!

या वर्षीचा फराळ बनवून आणण्यासाठी खालील व्यक्तींनी पुढाकार घेतला. त्या सर्वांचे धन्यवाद!

शेव: नीता शिंदे, पूजा त्रिपाठी, अंजली मेढेकर, ज्योत्स्ना फुले

करंजी: शकुंतला शिंदे, निवेदिता बदामी, माधुरी गोडसे, निमा कार

चकली: मनाली साने, स्वाती मुजुमदार, वीणा भिडे, लक्ष्मी महाजन, शारदा कणेरी

चिवडा: अस्मिता रंगनाथन, विनिता बेळंबे, अर्चना चौक, अनघा लेले

शंकरपाळे: अमिता मुल्हेरकर, मीनल वैद्य, वृषाली जोशी, जान्हवी जोशी, अंजली परांजपे

लाडू: निवेदिता भट्टे, अश्विनी साळुंखे, संगीता बोकील, शोभा जतकर, लीना ठकार

मंडळाच्या संचालक मंडळावरील काही सभासद निवृती घेत आहेत, तर काही पुढच्या वर्षीच्या कार्यकारिणीवर काम करण्यास उत्सुक आहेत. जुन्या सभासदांच्या अनुभवाचा आणि नव्या सभासदांच्या उत्साहाचा नवीन संचालक मंडळाला नक्कीच फायदा होईल. येत्या वर्षी ते मंडळाचे कार्यक्रम चोखपणे सादर करतील अशी आम्हाला खात्री आहे. नवनिर्वाचित संचालक मंडळाची संरचना अशी आहे:

• शंतनु भिडे (अध्यक्ष) • विनायक मोघे (उपाध्यक्ष) • प्रीती पोतदार (सचिव) • विनिता बेळंबे (कोषाध्यक्षा) • राजेश दिवेकर (जालसंचालक) • शेषन अनंतसुब्रमण्यम (विद्यार्थी प्रतिनिधी) • सुभाष हेगडे • राजेंद्र जाधव • चेतन काळभोर • मीता लोवलेकर • राजेंद्र महाजन • सेजल रानडे • अश्विनी साळुंखे • राहुल तेलंग

नवनिर्वाचित संचालक मंडळाचे अभिनंदन, तसेच मावळत्या संचालक मंडळाकडून शुभेच्छा!

– संचालक मंडळ २०१०–११, महाराष्ट्र मंडळ पिट्स्बर्ग